पुण्यनगरी दि 10-11-23

# साडेचार लाखांच्या ऐवजासह दोन चोरटे जेरबंद

**नांदेड/प्रतिनिधी**

भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने दि. ८ नोव्हेंबर रोजी २ संशयीतांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून ४ लाख ५० हजारांचा चोरीचा ऐवज हस्तगत केला आहे. या दोघांना पकडल्याने भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ४ आणि शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एक असे ५ गुन्हे उघडकीस आले आहेत.

भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या ४३६/२३ या गुन्ह्यातील आरोपी शोधण्यासाठी दोन पथके तयार करुन त्यांचा शोध सुरु होता. दि.८ नोव्हेंबर रोजी मंगळवारी भाग्यनगर ठाण्याच्या गुन्हे शोध पथकातील अधिकारी व अंमलदारांना दोन बुलेटस्वार संशयास्पध रितीने फिरताना मिळून आले. तौफिकखान अयुबखान (२४) रा.बिलालनगर देगलुर नाका, नांदेड व सलमानखान असलमखान (२८)रा.अदनान गार्डन धनेगाव या दोघांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ४३१/२३, ४३५/२३,४३६/२३,४३७/२३ आणि शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ३३५/२३ एक असे ५ गुन्हे केल्याची कबुली दिली.या गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या दोन्ही बुलेट बोधन तेलंगणा येथुन तर एक शाईन मोटार सायकल हिंगोली येथुन चोरल्याचे त्यांनी सांगितले. या दोघांकडुन दिड लाख रुपयांचे ४९ ग्रॅम सोने व ३ लाख रुपये किंमतीच्या दोन मोटार सायकली असा एकुण ४ लाख ५० हजार रुपयांचा माल हस्तगत करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, अपर पोलीस अधिक्षक खंडेराय धरणे, उपविभागीय पोलीस अधिक्षक सुरज गुरव, स्थागुशाचे पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुर्यमोहन बोलमवाड, पोलीस उपनिरीक्षक सुनिल भिसे, जमादार दिलीप राठोड, गजानन किडे, प्रदीप गर्दनमारे, कळके, पोकॉ हाणमंता कदम, ओमप्रकाश कवडे यांनी ही कारवाई केली. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांचे कौतुक केले आहे.



### सोने देण्याचे आमिष दाखवून लुटणारा गजाआड

एक वर्षापुर्वी लिंबगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत कमी किंमतीत अर्धा किलो सोने देतो, असे सांगून वरखेड शिवारात अर्जन शिंदे यांची १० लाख रुपयांची फसवणूक करणाऱ्या ८ चोरट्यांची नावे उघडकीस आली असून त्यामधील एका आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याकडून एक दुचाकी जप्त केली आहे.

लिंबगाव पोलीस ठाण्यात १५४/२३ नुसार कलम ३९५ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला होता. या प्रकरणातील आरोपी अर्जून शिंदे हा एक वर्षापासून फिर्यादीच्या संपर्कात होता. ऊस तोडण्यासाठी मजुर पुरवितो म्हणून फिर्यादीला नांदेडला बोलविले. नांदेड येथे आल्यानंतर कमी किंमतीत अर्धा किलो सोने देतो असे सांगून फिर्यादीला वरखेड शिवारात बोलावून ७ ते ८ जणांनी त्याच्याकडून १० लाख रुपये जबरदस्तीने काढून घेतले.

या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर लिंबगाव पोलिसांनी तपास सुरु केला. या प्रकरणी अर्जुन शिंदे, रा. उमरी, राहुल पवार, रा. मुदखेड, अनिल मारकुळे, रा. वसमत, सुरेश पवार, रा. वसमत, पिन्या गोरे, किशन गोरे, लखन एरंडले, सोन्या काळे सहभागी झाले असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. या गुन्ह्यातील अनिल मारकुळे, रा. वसमत याला अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडुन चोरी केलेल्या रकमेतून खरेदी **(पान २ वर..)**

## साडेचार...

केलेली एक हिरोहोंडा स्पलेंडर मोटार सायकल जप्त करण्यात आली आहे.या प्रकरणाचा तपास सुरू आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या पथकातील अधिकाऱ्यांचे कौतुक केले आहे.

असता त्याने धर्माबाद शहरातील शिक्षक कॉलनीतून दुचाकी चोरल्याची कबुली दिली. त्याच्या ताब्यातुन एक होंडा सीबी शाईन दुचाकी तसेच अन्य ३ दुचाकी अशा २ लाख ३५ हजार रुपये किंमतीच्या ४ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. यामळे धर्माबाद

Built-in-Oven | Refrigerators | Air Conditioner